महाराष्ट्र शासन
( गृह विभाग )
**महाराष्ट्र कारागृह विभाग**
अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह,कळंबा, कोल्हापूर
दूरध्वनी क्रमांक-0231 2324219
Web Site : www.mahaprison.gov.in
Email-kolhapurprison@ gmail.com,kolhapurcp-mh@gov.in

जा.क्र. कोमका/कारागृह उद्योग/ई-दरपत्रक/ ८०४ /२०२६ दिनांक-०९/०२/२०२६ १०

**ई - दरपत्रक जाहीरात - कारागृह उद्योग ( बेकरी विभाग )**

कोल्हापूर मध्यवर्ती कारगृह, कळंबा येथील कारागृह उद्योगांतर्गत **बेकरी / लाडू प्रसाद विभागाकरीता आवश्यक कच्चा माल** खरेदी करण्यासाठी मा. मुख्यालयाचे पत्र जा.क्र. कारागृह उद्योग/कच्चा माल खरेदी/१०३५५/२०२५/कक्ष-१० पुणे दिनांक २१/११/२०२५ चे आदेशानुसार शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दिनांक ०१ डिसेंबर २०२५ मधील ४.२ अन्वये जानेवारी २०२६ ते दि.३१/०३/२०२६ या तीन महिन्याचे कालावधीकरीता कच्चा माल खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १. | दरपत्रक सादर करण्याचा दिनांक व वेळ | दि. १५/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजतापर्यंत. |
| २ | दरपत्रक ऊघडण्याची वेळ | दिनांक १६/०२/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता |
| ३ | दरपत्रक ऊघडण्याचे ठिकाण | अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा यांचे कार्यालय. |
| ४ | तांत्रिक कागदपत्रे सादर करण्यासाठी ईमेल | १. kolhapurprison@gmail.com<br>२. kolhapurcp-mh@gov.in |

**आवश्यक कच्चा माल तपशील व मागणी**

| अ.क्र. | कच्चा माल तपशील | विनिर्देश | अंदजीत मागणी |
|---|---|---|---|
| १. | काजू | पांढरा शुभ्र, उत्तम प्रत | १००० किलो |

अधीक्षक
कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह,कळंबा.

**सोबत :** अटी व शर्ती जोडण्यात येत आहे तरी अवलोकन करावे.

## अटी व शर्ती :

| अ.क्र. | अटी शर्ती |
|---|---|
| 1 | दरपत्रकातील नमुद दर निविदा **दि.31/03/2026** पर्यत ग्राह्य राहतील, दरम्यान काळात दर बदलता येणार नाहीत. |
| 2 | दरपत्रक संस्थेच्या लेटरहेडवर व सही शिक्क्यासह सादर करावे. तसेच तांत्रिक कागदपत्रांवर स्वस्वाक्षरी असावी. |
| 3 | सहभागी संस्थेने दोन स्वतंत्र लिफाफे सादर करावेत **1) तांत्रिक कागदपत्रे** : एका लिफाफ्यामधून संस्थेची तांत्रिक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती व स्वाक्षरीसह सादर करावे.पाकीटावर कारखाना विभाग ई - दरपत्रक तांत्रिक कागदपत्रे असे नमुद करावे. **2) दरपत्रके** : दुसऱ्या सिलबंद लिफाफ्यातून लेटरहेड वरील किंवा फर्मच्या शिक्क्यासह व स्वाक्षरीसह दरपत्रक सादर करावे. ( दरपत्रकावर खाडाखोड किंवा व्हाईटनरचा वापर करू नये असे आढळल्यास दरपत्रक रद्द ठरविण्यात येईल. |
| 4 | तांत्रिक कागदपत्रांचा तपशील(सर्व कागदपत्राच्या छायांकीत प्रती स्वसाक्षांकीत करून सादर करावीत 1) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र. 2) शॉप ॲक्ट.1948 अंतर्गत वैध प्रमाणपत्र., 3) संस्थेचे पॅन / टॅन , उद्योग आधार प्रत 4) पुरवठादारचे हमी पत्र ( सोबत नमुना जोडला आहे.) 5) फुड परवाना 6) सहभागी संस्थेचे हमीपत्र ( सोबत जोडलेल्या नमुण्याप्रमाणे ) |
| 5 | सदर दरपत्रक निविदेमध्ये प्रथम तांत्रिक कागदपत्रांची तपासणी व छाननी करण्यात येईल. |
| 6 | एखादे दरपत्रक स्विकारणे किंवा रद्द करणे याचे अधिकार अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा कार्यालयाने राखुन ठेवले आहेत. |
| 7 | कच्चा माल या कार्यालयाचे मागणीप्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील. |
| 8 | पुरवठा दाराने कच्चा माल मागणी प्राप्त झाल्यानंतर 48 तासांत किंवा तातडीने कारागृहाचे मनेगेट मध्ये किंवा कारखाना गोदाम पर्यंत स्वखर्चाने पुरवठा करावे लागेल. |
| 9 | दिलेल्या विनिर्देशाप्रमाणे कच्चा मालाची प्रत असावी. खराब माल स्विकारला जाणार नाही. |
| 10 | दरपत्रकामध्ये या कार्यालयाचे जाहीरात संदर्भ क्रमांक व दिनांक नमुद करावा. |
| 11 | कच्चा माल मागणीनुसार **उधारीने पुरवठा करावा लागेल. पुरवठा केलेल्या मालाचे देयकाची रक्कम अनुदान प्राप्त झाल्यानंतर CMP प्रणालीद्वारे अदा करण्यात येईल.** |
| 12 | निविदा पेटीतून प्राप्त दरपत्रकांचाच विचार करण्यात येईल. इतर कोणत्याही मार्गाने दरपत्रके सादर करू नयेत. |
| 13 | दरपत्रकातील सर्व वस्तुचे दर नमुद करणे अनिवार्य राहील, कोणताही रकाना रिकामा सोडू नये. |
| 14 | आपले संस्थेची तांत्रिक कागदपत्रे **रविवार दिनांक** 15/02/2026 **रोजी सायंकाळी** 05:00 **वाजता पर्यंत** kolhapurprison@gamil.com किंवा kolhapurcp-mh@gov.in या ई मेल द्वारे सादर करावीत. |
| 15 | तसेच तांत्रिक कागदपत्रांच्या छायांकीत प्रती त्यावर संस्थेचा शिक्का व स्वस्वाक्षरीसह स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यातून मुख्य प्रवेशद्वारात ठेवलेल्या दरपत्रक पेटीमध्ये रविवार दिनांक 15/02/2026 रोजी सायंकाळी 05:00 वाजता पर्यंत सादर करावेत. पाकीटावर तांत्रिक कागदपत्रके असे नमुद करावे. |
| 16 | तसेच आपले दरपत्रक (संस्थेच्या लेटरहेडवर, शिक्का व स्वस्वाक्षरीसह सलबंद लिफाफ्यातून **रविवार दिनांक** 15/02/2026 **रोजी सायंकाळी** 05:00 **वाजता पर्यंत** सादर करावीत. त्यानंतर येणारी दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत. |
| 17 | **दरपत्रक पेटी दि.**16/02/2026 **रोजी सकाळी** 11:30 **वाजता** अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह यांचे दालनात उघडण्यात येतील. |
| 18 | दर पत्रक उघडण्याचे वेळी पुरवठादार संस्थेचे प्रतिनिधी हे विहीत वेळेत मुळ कागदपत्रांसह उपस्थित राहु शकतात. तसेच जर का कोणीही प्रतिनिधी उपस्थित नसल्यास समिती समक्ष दरपत्रक पेटी उघडण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| 19 | वरील प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास किंवा पुर्तता न केल्यास दरपत्रक रद्द समजण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| 20 | सोबत हमीपत्र नमुणा. |

**अधीक्षक**

**कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह कळंबा.**